# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०४/०९/२०१८**

आज मंगळवार दि. ०४/०९/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २४/०८/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १३) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १४) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १५) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १६) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १७) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १८) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| १९) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २०) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २१) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २२) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २३) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २४) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २५) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २६) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| २७) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| २८) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| २९) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ३०) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| ३१) | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| ३२) | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| ३३) | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |
| ३४) | **पांडे स्नेहा शैलेश** | **सदस्या** |
| ३५) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| ३६) | **शिर्के अनंत गेणू** | **सदस्य** |
| ३७) | **पाटील वंदना विकास** | **सदस्या** |
| ३८) | **डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश** | **सदस्या** |
| ३९) | **गेहलोत हसमुख मोहनलाल** | **सदस्य** |
| ४०) | **शिंदे रुपाली वसंत (मोदी)** | **सदस्या** |
| ४१) | **थेराडे संजय अनंत** | **सदस्य** |
| ४२) | **मुखर्जी अनिता बबलू** | **सदस्या** |

| | | |
|---|---|---|
| ४३) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४४) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४७) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४८) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५३) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५५) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५६) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५७) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५८) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ६८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ६९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७०) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७३) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७५) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७६) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| २) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| ३) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| ४) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ५) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ९) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| १०) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ११) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| १२) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| १३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १५) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |

१६)	**बांड्या एलायस दुमिंग**	**सदस्य**

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| **२)** | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| **३)** | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |

**मा. महापौर :-**

नमस्कार. उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी, गटनेते, नगरसेवक, नगरसेविका, आयुक्त, अधिकारी, पत्रकार बंधु व नागरीक यांचे स्वागत आहे. गणेशचतुर्थी व मोहरम सणाच्या सर्वांना शुभेच्छा. सर्वांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात शांततेच्या वातावरणात पार पाडावी.

**नगरसचिव :-**

सभासुचना टाईप करणे. महासभेच्या कामकाजाला सुरुवात करणेपूर्वी आजच्या महासभेसाठी शासनाला २ के खाली प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव आहे दोन के खाली बोर्ड बॅनर इत्यादी जाहिरातीमुळे शहरात होणार विद्युतीकरण थांबविणे आणि दुसरा प्रस्ताव आहे मा. महासभा दि. २६/२/२०१८ रोजी ठराव क्र. ९० अन्वये उत्सवासाठी ठरविलेल्या मंडप परवानगीबाबत मंडप परवानगी दरबाबत फेरविचार करणे. हे दोन प्रस्ताव प्रशासनाकडून आलेले आहेत. २ के खाली ह्या दोन्ही प्रस्तावांना सभागृहाची मान्यता आहे. हे दोन्ही प्रस्ताव २ के खाली आहेत. ते विषयपत्रिकेवरील तो विषय पूर्ण झाल्यानंतर शेवटी घेण्यात येतील.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम आजची सभा सुरु झालेली आहे. आपणा सर्वांना माहित आहे सभागृहातील सर्व सदस्यांना माहित आहे. जगाच्या पाठीवरती माहित आहे की ह्या देशाचे माजी पंतप्रधान सन्मा. राजनिती तज्ञ वाजपेयी यांचे निधन झालेले आहे. तसेच अनेक मान्यवरांचे ह्याच कालावधीत निधन झालेले आहे. आपण एक व्यथा म्हणून सभागृहाला विनंती करतो की प्रथमतः आम्ही शोकप्रस्ताव मांडतो तसेच शिवसेना, कॉंग्रेस यांच्यावतीने किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी ते शोकप्रस्ताव मांडावे अशी मी विनंती करतो. माझ्या जवळ जे शोकप्रस्ताव आहेत त्यांना मी सुरुवात करतो. **भारताचे माजी पंतप्रधान , सन्मानित राजनितिज्ञ , अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे महान नेते भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करीत आहे. देशातील सव्वाशे कोटीहून अधिक भारतीयांचे प्रेम लाभलेल्या मा . अटलबिहारी वाजपेयी, आपले “अटलजी”, यांच्या निधनाने देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे . मध्य प्रदेशच्या ग्वाल्हेरमध्ये २५ डिसेंबर १९२४ रोजी श्रीमती कृष्णा देवी व श्री. कृष्णबिहारी वाजपेयी यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. त्यांनी त्यांचे नाव अटलबिहारी असे ठेवले. अटलबिहारी वाजपेयीजी यांचे शिक्षण ग्वाल्हेर व का नपूर येथे झाले , त्यानंतर काही काळ त्यांनी पत्रकारीता केली. “राष्ट्रधर्म”, “पांचजन्य” व “वीर अर्जून” अशा वृत्तपत्राचे संपादनही त्यांनी केले . सुरुवातीला आर्य समाज व नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले व त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला . देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला व “भारत छोडो ” आंदोलनात कारावास देखील भोगला . भारतीय जनसंघाचे ते अध्यक्ष झाले व नंतर भारतीय जनता पक्षाचे संस्थापक अध्यक्ष झाले . संसदीय गटनेता व तद्नंतर पंतप्रधान म्हणून अविस्मरणीय योगदान दिले . अटलबिहारी वाजपेयीजी यांची दहा वेळा लोकसभा सदस्य म्हणून दोन वेळा राज्यसभा म्हणून निवड झाली. सन १९७५ ते १९७७ दरम्यान देशातील आणीबाणीचा कडाडून विरोध केला, परिणामी त्यांना तुरुंगवासाच्या यातना सहन कराव्या लागल्या. दिर्घकाळ विरोधी पक्षाचा नेता म्हणून काम केल्यानंतर ते १९९६ साली सर्वप्रथम पंतप्रधान झाले. सन १९९८ ते १९९९ मध्ये दुसऱ्यांदा व १९९९ ते २००४ या कालावधीत त्यांनी पंतप्रधान पद भुषविले . लोकनायक व युगपुरुष अटलबिहारी वाजपेयी काया-वाचा-मनाने सर्वस्वी राष्ट्राकरीता समर्पित नेता होते . राजकारणात त्यांचे प्रतिस्पर्धी होते पण विरोधक कोणीही नव्हते. देशात आणि विदेशात स्वपक्षात आणि विरोधी पक्षात सर्वत्र त्यांचे चाहते होते . त्यादृष्टीने अजातशत्रू होते. त्यांच्या जीभेवर साक्षात सरस्वतीचा निवास होता. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने त्यांनी लोकांच्या मनावर राज्य केले .** देशाच्या सार्वजनिक जीवनावर त्यांनी आपल्या वक्तृत्व आणि कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटवला आहे. त्यांच्या विराट व्यक्तिमत्वामध्ये देशाचा अनेक दशकांचा इतिहास सामावलेला आहे. अटलजी एक परिपक्व राजकारणी, एक कुशल प्रशासक, संवेदनशील कवी, साहित्यिक आणि त्याचबरोबर एक श्रेष्ठ मानव होते. भूक, भय, अभाव आणि निरक्षरतेपासून मुक्त भारत निर्माण करण्यासाठी समर्पित त्यांच्या कविता अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या माणुसकीच्या जाणीवांमुळे ते आंतरराष्ट्रीय पातळीवर एक संवेदनशील राजकीय नेता म्हणून परिचित आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी पार पाडलेल्या भूमिकेचे आजही स्मरण केले जाते. ते भारताचे राजकीय नेता होते पण त्यांची लोकप्रियता संपूर्ण जगभर होती. आधी खासदार, नंतर परराष्ट्रमंत्री व त्यानंतर पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाच्या परराष्ट्र धोरणाला नवे वळण दिले. विश्वबंधुत्व, परस्पर समानता आणि विश्वशांतीसाठी त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची सदैव आठवण राहील. भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर **प्रथम** हिंदीत भाषण करून हिंदी भाषेला आंतरराष्ट्रीय पातळीवर **खास** महत्व मिळवून दिले. **मे १९९८ मध्ये वाजपेयी सरकारने जमिनीखाली ५ अणुचाचण्या केल्या. सत्ता प्राप्त केल्यावर केवळ एका महिन्यात करण्यात आलेल्या या चाचण्या जगाला , खास करून अमेरीकेला हादरवणाऱ्या ठरल्या ,**

**कारण भारताने अमेरिकेच्या हेरगिरी उपग्रहाला चुकवून त्या पार पाडल्या होत्या . रशिया आणि फ्रान्स यांनी भारताच्या स्वसंरक्षणासाठी आणि शांततापूर्ण उपयोगासाठी अण्वस्त्रक्षमतेचे समर्थन केले. वाजपेयींच्या आर्थिक धोरणांमुळे भारताला त्यांची झळ लागली नाही . अखेर भाजप आणि वाजपेयींच्या प्रतिमेच्या दृष्टीने या अणुचाचण्या लाभदायीच ठरल्या.** शेजारील राष्ट्रां**समवेत** भारताचे संबंध सौहार्दाचे व शांततापूर्ण असावेत **याकरीता** त्यांनी निरंतर प्रयत्न केले आणि त्यांनी सदैव भारताचे हित सर्वात महत्त्वाचे मानले. त्या दृष्टीने लाहोर बस यात्रा आणि आग्रा शिखर संमेलन प्रमुख मैलाचे दगड आहेत. पंतप्रधानपदाचा त्यांचा कार्यकाळ गतीने प्रगती आणि विकासाचे नवनवे विक्रम स्थापित करण्यासाठी सदैव आठवणीत राहील. सुवर्ण चतुष्कोण राष्ट्रीय महामार्ग योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना, टेलिफोनची व्यापक उपलब्धता, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भरारी आणि ऊर्जा क्षेत्रातील अनेक यशस्वी योजनांचा प्रारंभ ही त्यांच्या कारकीर्दीची काही वैशिष्ट्ये आहेत. अटलजींच्या कारकीर्दीत उत्तराखंड, झारखंड आणि छत्तीसगड या तीन राज्यांची निर्मिती झाली. डोंगराळ भाग व आदिवासी क्षेत्रातील जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हा फार महत्त्वाचा निर्णय होता. **अटलबिहारी वाजपेयी आणि रामभाऊ म्हाळगी यांचे नाते अतूट आहे . २००३ मध्ये पंतप्रधान असताना अटलजींच्या हस्ते रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे लोकार्पण करण्यात आले होते . त्याचप्रमाणे २००४ मध्ये भारतीय जनता पक्षातर्फे राष्ट्रीय चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती .** अटलबिहारी वाजपेयी केवळ प्रखर आणि ओजस्वी वक्ताच नव् **हे** तर मोठ्या मनाचे व् **यक्तीमत्व** होते. राजकारणात त्यांची संवेदनशीलता व्यक्त होत असे. जेव्हा ते विरोधी पक्षात होते तेव्हा सरकारच्या जनहिताच्या कामांची प्रशंसा करण्यात त्यांना मुळीच संकोच वाटत नसे. त्यांनी विरोधही रचनात्मक पद्धतीने केला. त्यांच्या या गुणांमुळेच ते पक्षांची बंधने ओलांडून सर्वप्रिय राजकीय नेता म्हणून प्रस्थापित झाले होते. आयुष्यभर संसदीय परंपरांचे पालन करून त्यांनी भारताच्या संसदीय लोकशाहीला समृद्ध केले होते. पंडित **दि**नदयाळ उपाध्याय यांना अटलजींमध्ये भारताचे भवितव्य दिसले होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अटलजींची क्षमता ओळखून असे म्हटले होते की, ते एक दिवस भारताचे नेतृत्व करतील. राम मनोहर लोहिया त्यांच्या हिंदीप्रेमाची प्रशंसा करत. माजी पंतप्रधान चंद्रशेखर त्यांना संसदेत 'गुरुदेव' म्हणून संबोधित करत असत. अटलबिहारी वाजपेयी यांना सर्वोत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कारही देण्यात आला होता. त्यांच्यासाठी देशहित सर्वात महत्त्वाचे होते. १९९३ साली विरोधी पक्षनेता असूनही मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत भारताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याचा सरकारचा प्रस्ताव स्वीकारला आणि जिनेव्हात आयोगाच्या बैठकीत भारताची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडली. त्यांच्या निधनाने केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगातून एक दूरदृष्टी, परिपक्व, संवेदनशील, मोठ्या मनाचा **,** दृढ निश्चयी असा अटल नेता गेला. त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून चालत भारताला एक महान राष्ट्र करण्याचा त्यांचा संकल्प पूर्ण करण्यात आम्ही सहभागी होऊ. अटलबिहारी वाजपेयीजी यांच्या निधनाबद्दल **ही सभा** तीव्र शोक व्यक्त करत आहे तसेच त्यांच्या शो**काकुल** आपली संवेदना व्यक्त करत आहे . कृतज्ञ राष्ट्रातर्फे अटलजींना शत-शत नमन. तसेच आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील **"शहिद मेजर कौस्तुभ राणे" हे श्री. प्रकाशकुमार राणे यांचे एकमेव सुपूत्र होते. त्यांचा जन्म मिरा भाईंदर शहरातील शितल नगर, मिरारोड येथे झाला. त्यांचे शिक्षण मिरारोड येथील होली क्रॉस या शाळेत व महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी रावल कॉलेज येथून पूर्ण केले . पुणे येथून संगणकीय ॲप्लीकेशन मध्ये पदवी घेतली. सन 2008 मध्ये ते सेना मध्ये लेफ्टनंट या पदावर रुजू झाले. सन 2011 मध्ये कॅप्टन या पदी नियुक्त झाले व तद्नंतर आता 2018 साली त्यांना मेजर या पदाने सन्मानित करण्यात आले. तसेच दि.26 जानेवरी रोजी मेजर राणे त्यांना सेना सम्मानाने सम्मानित करण्यात आले. उत्तर काश्मिरच्या बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टरमध्ये भारतीय लष्कराने दहशतवाद्यांविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईत महाराष्ट्राचे सुपुत्र तसेच मिरा भाईंदर महापालिकेच्या मिरारोड येथील रहिवासी मेजर कौस्तुभ प्रकाश राणे यांना मंगळवार दि.07 ऑगस्ट 2018 रोजी अतिरेक्यांशी लढताना ते शहिद झाले . "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांच्या निधनाने शहरामध्ये युवा तरुण व नागरीकांमध्ये देशप्रेरणेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांनी दिलेले बलिदान हे मिरा भाईंदर शहरातील तमाम जनतेच्या मनात सदैव जिवंत राहील. शहरात "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांचे नाव शहरवासियांच्या मनात, हृदयात सदैव जिवंत रहावे व <u>त्यांचा यथायोग्य सम्मान व्हावा याकरीता</u> आजच्या मा. महासभेत प्रस्ताव मंजुरीकरीता <u>मिरारोड रेल्वे स्टेशन समोरील चौकात "हुतात्मा स्मारक" बांधणे तसेच मिरारोड येथील जॉगर्स पार्कला "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांचे नाव देणे.</u> सदर कुटूंबाची संमती असल्यास त्यांच्या कुटूंबातील एखादया व्यक्तीला महापालिका सेवेत रुजू करणेबाबत प्रशासनामार्फत आवश्यक ती पूर्तता करावी व त्यांच्या कुटूंबानी संमती दिल्यास त्यांच्या चिंरजीवास शिष्यवृत्ती देवून पुढील संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी महापालिकेने घ्यावी तसेच त्यांच्या कुटूंबियांना त्यांची समंती असल्यास आर्थिक मदत म्हणून महापालिकेकडून रु .11 लाख रुपये देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे . देशरक्षणार्थ अतुलनीय कामगिरी करणाऱ्या "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांना हि सभा श्रध्दांजली देण्यात येत आहे. तसेच तामिळनाडू राज्याचे डि.एम.के पक्षाचे प्रमुख कै . करुणानिधी यांचे दि . ०७/०८/२०१८ रोजी निधन झाले. ते पाच वेळा तामिळनाडू राज्याचे मुख्यमंत्री होते . ६० वर्षे ते राजकारणात सक्रीय होते . दर निवडणूकीमध्ये ते निवडणूक येण्याचा त्यांनी विक्रम केलेला आहे . ते राजकारणाबरोबर एक नाटककार , एक कथाकार म्हणून प्रसिध्द होते . त्यांच्या दि . ०७/०८/२०१८ रोजी अल्पशा आजाराने निधन झालेबद्दल ही सभा**

शोक व्यक्त करुन त्यांना श्रध्दाजली अर्पण करीत आहे. तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुरुदास कामत हे दिल्लीत कामानिमित्त आले असताना त्यांना हार्ट अटॅक आल्याने दि. २२/०८/२०१८ रोजी त्यांचे अकस्मात निधन झाले. हॉस्पीटलमध्ये पोहोचेपर्यंत त्यांनी अखेरचा श्वास घेतला होता . ६३ वर्षाचे कामत हे आयुष्यभर मुंबई काँग्रेसमध्ये सक्रिय होते. सत्तरच्या दशकात त्यांनी विद्यार्थी चळवळीतून राजकारणात प्रवेश केला. १९७६ साली ते NSUI चे अध्यक्ष होते. १९८४ ला ते पहिल्यांदा मुंबईतून लोकसभेवर निवडून गेले. २००३ ते २००८ ते मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते. २००९ ते २०११ या काळात ते UPA सरकारमध्ये राज्यमंत्री होते. त्यांनी वेळोवेळी पक्षाची इतर राज्यातील जबाबदारीही स्वीकारली होती. "शिवसेनेचा झंझावात असतानाही काँग्रेस पक्ष जनतेपर्यंत नेण्यात गुरुदास कामतांचं योगदान मोलाचं होतं . त्यांच्या कार्यकर्त्यांची फळी मोठी होती ,". कै. श्री. गुरुदास कामत यांच्या दि.22/08/2018 अस्कमात निधनाबद्दल ही सभा तीव्र शोक व्यक्त करत आहे तसेच त्यांच्या शोकाकुल आपली संवेदना व्यक्त करत आहे. तसेच दि. ०१ एप्रिल १९४१ रोजी अजित वाडेकर यांना जन्म झाला होता. अजित वाडेकर यांच्या नेतृत्त्वाखाली भारताला परदेशात पहिली कसोटी मालिका जिंकून दिली . १९७१ मध्ये वाडेकरांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघानं वेस्ट इंडिज आणि इंग्लंड या बलाढ्य संघांचा त्यांच्याच मायदेशात पराभव केला. १९५८ पासून प्रथम श्रेणी क्रिकेट खेळण्यास सुरुवात करणाऱ्या वाडेकरांनी १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं . १९६६ ते १९७४ या कालावधीत वाडेकर भारतीय संघाकडून खेळले . आंतरराष्ट्रीय स्तरावर ते एकूण ३७ कसोटी सामने खेळले. यामध्ये त्यांनी एक शतक आणि चौदा अ र्धशतकं झळकावली. अजित वाडेकर हे गॅरी सोबर्स यांचेप्रमाणे डावखुरे आक्रमक फलंदाज आणि स्लिपमधील सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणूनही ते ओळखले जायचे. बहुतेकदा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायला येणाऱ्या वाडेकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३७ कसोटी सामन्यांमध्ये २ हजार ११३ धावा केल्या. भारत सरकारनं १९६७ मध्ये अर्जुन पुरस्कारानं त्यांचा गौरव केला होता. तर १९७२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. त्यांच्या निधनानं क्रिकेट विश्वातील मोठा तारा निखळला अशी हळहळ सर्वत्र व्यक्त होत आहे . परदेशी भूमीवर भारताला विजयाची सवय लावून देणारा कर्णधार अजित वाडेकर यांना श्रध्दांजली अर्पण करत आहे . तसेच अस्सल विनोदांमधून रसिकांना खळखळून हसवणारे ज्येष्ठ अभिनेते <u>विजय चव्हाण</u> त्यांच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीतील तारा निखळल्याची भावना व्यक्त होत आहेत . विजय चव्हाण यांनी अनेक नाटकांत आणि चित्रपटांत कामे केलेली असून , <u>प्रल्हाद केशव अत्रे</u> यांनी लिहिलेल्या <u>मोरूची मावशी</u> या नाटकातील मावशीच्या स्त्री-भूमिकेसाठी ते विशेष ओळखले जातात. विजय चव्हाण यांना काही महिन्यांपूर्वीच चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कारने सन्मानित करण्यात आलं होतं . 'अशी असावी सासू 'मधल्या भूमिकेसाठी त्यांना राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. याशिवाय, त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं होतं. विजय चव्हाण यांच्या निधनाने चित्रपट आणि नाटक क्षेत्राची मोठी हानी झाली असून महाराष्ट्राच्या अशा अष्टपैलू अभिनेत्यास ही सभा श्रध्दांजली वाहत आहे. तसेच मध्य प्रदेश मध्ये १९६७ मध्ये दिगंबर जैन मुनी त्यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव पवन कुमार जैन असे होते . जैन संत बनण्याकरीता त्यांनी दि. ८ मार्च १९८१ मध्ये घराचा त्याग केला होता. दिगंबर जैन मुनी हे त्यांच्या प्रवचनाकरीता प्रसिध्द होते. "कडवे प्रवचन" या नावाने ते समाजाला संदेश देत . ते समाज आणि राष्ट्र जीवनाच्या मुख्य मुद्दयांवर त्यांचे सल्ले देत . मुनी तरुण सागरजी महाराज यांच्या अकाली निधनामुळे अतिशय दुःख झाले असून त्यांचे विचार लोकांना प्रेरणा देत राहतील. त्यांच्या अकाली झालेल्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांना श्रंध्दाजली अर्पण करीत आहे. तसेच तसेच आपल्या देशातील केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी महाभयंकर पूर आलेला असून, त्या त्या ठिकाणी मुसळधार पाव साने तेथील जनजीवन मोडीत काढले आहे . सध्याच्या स्थितीला देशात सुमारे हजारो कोटींच्या मालमत्तेचे नुकसान झालेले आहे . लाखांहून अधिक नागरिक पुरामुळे बेघर झाल्याचेही त्यांनी सांगितलं. भूस्खलनामुळे मातीखाली दबून व प्रवाहात वाहून गेल्याने अनेकांचा मृत्यू झालेले आ हेत. अस्मानी संकटामुळे उध्दभवलेल्या या आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या मृत नागरीकांच्या आत्म्यास श्रध्दांजली अर्पण करीत आहे व केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी नागरीकांचे विस्कळीत जनजीवन सुस्थितीत येणेस ईश्वर बळ देवो.

हरिश्चंद्र आमगावकर :-

स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयीजी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांना शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच स्वर्गीय करुणानिधी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच स्वर्गीय गुरुदास कामत यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच स्वर्गीय अजित वाडेकर यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच स्वर्गीय विजय चव्हाण यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच स्वर्गीय जैन दिगंबर मुनी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. तसेच केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी महाभयंकर पुरस्थितीमुळे मृत्यू पडलेल्या नागरीकांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

अनिल सावंत :-

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी ५० वर्षाचे संसदीय कारर्किद कशी असावी हे खरच ह्या महात्म्यास जवळून शिकण्यासारखे आहे. तीन पिढ्या बरोबरचे त्यांचे संबंध पं. जवाहरलाल नेहरुंनी ज्यावेळी त्यांना पहिल्यांदा राजकारणात बघितले त्यावेळी धाळीत केले होते की, हा मुलगा देशाचा पंतप्रधान बनणार आहे. पं. जवाहरलाल नेहरु सांभाळत असलेले परराष्ट्र खाते ज्यावेळी अटल बिहारी वाजपेयी परराष्ट्र मंत्री बनले त्यावेळी ते कॅबीनमध्ये गेल्यानंतर त्या खुर्चीवर पं. जवाहरलाल नेहरु बसत होते त्या खुर्चीवर त्यांनी स्पर्श केला नमस्कार केला आणि म्हणाले की मी आयुष्यामध्ये कधी वाटले नव्हते की ह्या खुर्चीवर बसेन. ते पोलीस सुध्दा त्या केबीनमध्ये उभे होते सहज त्यांचे लक्ष त्या भिंतीजवळ गेले. त्याठिकाणी पं. जवाहरलाल नेहरुंची तस्वीर होती. पण दुसरे सरकार आल्यानंतर त्यांनी अधिका-यांनी पिठासिन म्हणून पं. जवाहरलाल नेहरुंची तस्वीर तिथुन काढलेली होती. प्रशासकीय कामकाज आहे पण त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी यांनी सांगितले की पहिल्यांदा ती तस्वीर आणुन तेथे लावा. एवढे मोठे मन असलेला हा नेता बांग्लादेश ज्यावेळी स्वतंत्र झाला इंदिरा गांधींनी अमेरीकेशी वैफल्य पत्कारुन ज्यावेळी बांग्लादेश स्वतंत्र केला त्यावेळी संसदीय सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या पंतप्रधानांना रंगराघव, दुर्गा माँ असे वाजपेयी यांनी संबोधले होते. राजीव गांधी बद्दलची आठवण तर एकदम मन हेलावणारी आहे. भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी हे त्यावेळी पंतप्रधान होते आणि त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी विरोधी पक्षनेता होते त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. आरोग्य विभाग आरोग्य विषयक सुख सुविधा तेवढ्या प्रबोधन झाल्या नव्हत्या. भारतामध्ये आणि बाहेरचा जो खर्च होता तो सुध्दा कॉस्टली होता त्याला एका अशा आजाराने अग्रस्त होते की त्यांना तिथे बाहेरच्या देशामध्ये अमेरीकेमध्ये जाऊन ट्रीटमेंट घेणे गरजेचे होते. संयुक्त राष्ट्रसंघाची शिखर परिषद न्युयॉर्कमध्ये आयोजित करण्यात आली होती. भारताचे शिष्टमंडळ त्यावेळी जाणार होते. राजीव गांधीजींनी त्यांना आपल्या केबीनमध्ये बोलवले नंतर सांगितले की शिष्ट मंडळामध्ये मी तुमचा समावेश करत आहे. शिष्टमंडळाबरोबर भारताची बाजू तुम्ही मांडणारच पण तुमच्यावर औषध उपचार करुन घ्यायचे आहेत. बाहेरच्या देशामध्ये ते तुम्ही ह्या निमित्ताने करुन घ्याल अशी मला आशा आहे. आणि ही आठवण जोपर्यंत राजीवजी जिवंत होते ना राजीवजी कधी बोलले ना अटलजी कधी बोलले ज्यावेळी राजीवजींची निघृण हत्या झाली त्यावेळी प्रेस कॉन्फरन्समध्ये अटलजींनी ती आठवण सांगितली. एवढा हा महान नेता काँग्रेस पक्षाचा आणि सभागृहाच्या वतीने त्यांचा शोक प्रस्ताव ह्या ठिकाणी मी मांडत आहे. **भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांचे दिर्घ आजाराने दि. १६/०८/२०१८ रोजी दुख:द निधन झाले. तीन वेळा भारताचे पंतप्रधान होण्याचा मान त्यांनी मिळविला. कवी मनाच्या वाजपेयींची १०० पेक्षा जास्त पुस्तके प्रसिध्द झाली ते उत्कृष्ठ कवी होते. १० वेळा ते लोकसभेवर व २ वेळा राज्यसभेवर निवडून गेले. भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी पंतप्रधान असतेवेळी वाजपेयी विरोधी पक्षनेता होते. त्यावेळी न्युयॉर्क यथे झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या परिषदेसाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळात त्यांचा समावेश करण्यात आला यावरुन त्यांची योग्यता दिसून येते. ते आजतशत्रु होते. आपल्या शांत व सौम्य स्वभावामुळे, व घेतलेल्या कणखर भुमिकेमुळे केवळ देशातच नव्हे, तर जगभरात त्यांनी आदराचे स्थान मिळविलेले आहे . त्यांचे व्यक्तीमत्वच बहुआयामी होते. त्यांचा राजकीय प्रवास आदर्शवत होता . भारताच्या सर्वाधीक लोकप्रिय पंतप्रधानांमध्ये त्यांचा समावेश होतो . भारतीय आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करुन देण्यात आणि जगावर भारताचा ठसा उमटविण्यात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा वाटा सिंहाचा आहे . त्यांनी घेतलेला अण्वस्त्र चाचणीचा निर्णय, कारगील युध्दात पाकीस्तानला दिलेला शह आणि आर्थिक सुधारणांचा पाया मजबुत करण्यासाठी त्यांनी सुरु ठेवलेल्या उपाययोजना भारतासाठी आजही फायद्याच्या ठरत आहेत. लालकृष्ण अडवाणी आणि भैरोसिंग शेखावत आणि त्यांनी १९८० साली भाजपाची स्थापना केली . प्रमुख विरोधी पक्ष म्हणून सरकारला जेरीस आणणाऱ्या भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मानही त्यांना मिळाला होता . एवढ्या मोठ्या पक्षाची सुरुवात सुरुवात केवळ दोन खा सदारांनी झाली. तरीही भाजपा हा देशाच्या मुख्य प्रवाहात राहिला आणि वाजपेयी हेच पक्षाच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या कवितेप्रमाणे त्यांचे व्यक्तीमत्वदेखील तितकेच प्रभावी होते. आयुष्यभर सर्वसामान्यत्व त्यांनी जपले. "साधे जीवन, उच्च विचार" हे त्यांच्या जीवना चे सार होते. जिभेवर सरस्वती अन् मनात भारतमाता घेवून जगणारे ते अलौकिकच होते. अशा या महान नेत्याला, भारत मातेच्या सुपुत्राला भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांना या सभागृहाची भावपूर्ण श्रध्दांजली .** मेजर कौस्तुभ राणे यांचा अभिनंदनाचा ठराव ह्या सभागृहासमोर मांडला गेला. सर्वांनी मने त्यावेळी हेलावली होती आणि त्यावेळी त्यांनी विचारही केला नव्हता की दोन महिन्यामध्ये आम्हाला त्यांच्याविषयी शोकप्रस्ताव ह्या सभागृहात आणावा लागेल. **पाकिस्तानातुन भारताच्या हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या दहशतवाद्यांचा प्रयत्न मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जवानांनी उत्तर काश्मिर मधील बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टरमध्ये होणून पाडला. या धाडसी कारवाईत मंगळवार दि . ०७/०८/२०१८ रोजी चार अतिरेकी ठार झाले असले तरी मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या सह तीन जवानांना वीरमरण आले. यामध्ये मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे, हवालदार जमी सिंग , हवालदार विक्रमजीत व रायफलमन मनदीप यांचा समावेश होता.मिरारोडच्या शितल नगरमधील हिरलसागर इमारतीत राणे कुटूं ब राहते . ते मुळचे कोकणातील वैभववाडीतील सडूरे गावाचे आहेत. १९७८ पासून ते मिरारोमध्ये स्थायीक झाले. मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे याच भागात लहानाचे मोठे झाले. येथील होली क्रॉस शाळा व रावल विद्यालयामध्ये त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले होते. मेजर कौस्तुभ प्रका शकुमार राणे भारतीय सीमारेषेवर कार्यरत असताना दाखविलेल्या असाधारण शौर्याबद्दल दि. २६ जोनवारी २०१८ रोजी भारताचे माननीय राष्ट्रपती यांचे हस्ते "सेना मेडल" पदान करण्यात**

**आले होते. मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे हे या शहराचे सुपुत्र असून शीतल नगर , रुम नं.९, हिरल सागर, मिरारोड, पूर्व ठाणे-४०११०७ येथे राहत होते. २०१० साली कम्बाईन डिफेन्स सर्विस परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी ऑफीसर्स ट्रेनिंग चेन्नई येथे पूर्ण केले . ऑक्टोबर २०११ मध्ये ते लेफ्टनंट पदावर रुजु झाले , २०१३ साली ते कॅप्टन झाले व २०१८ साली मेजर पदावर कार्यरत झाले. ३६ वी बटालियन दि राष्ट्रीय रायफल्स मध्ये भारताच्या सिमेचे देशाचे रक्षण करण्याचे महान कार्य करत होते. त्याबद्दल याच सभागृहाने अभिनंदनाचा ठराव केला होता. गुरुवार दि. ०९/०८/२०१८ रोजी मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या अंतिम यात्रेवेळी शहरातील जमलेला प्रचंड जनसमुदाय ही मेजरांना खरी मानवंदना होती . यावेळी त्यांच्या कुटूंबियांनी दाखविलेले धैर्य अतुलनिय होते. अशा वेळी ईश्वर या कुटूंबाला या दु :खातुन बाहेर पडायची शक्ती देवो . मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे, हवालदार जमी सिंग, हवालदार विक्रमजीत व रायफलमन मनदीप यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहून हे सभागृह मानवंदना देत आहे. तसेच काँग्रेसचे जेष्ठ नेते गुरुदास कामत यांचे अल्पशा आजाराने दि. २०/०८/२०१८ रोजी दु:खद निधन झाले. उत्तर-पश्चिम मुंबई मतदार संघातून ते चार वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. केंद्रीय मंत्री मं डळात राज्य मंत्री म्हणून त्यांनी महत्वाची भुमिका निभावली होती . पेशाने वकील असलेल्या स्व. गुरुदास कामत यांचा जनसंपर्क दांडगा होता व संघटनेवर सुध्दा त्यांची पकड घट्ट होती . मुंबई प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाल उज्वल होता . स्व. गुरुदास कामत यांना या सभा गृहाची भावपूर्ण श्रध्दांजली.**

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम सभागृहाने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी ठराव मांडत आहे. आजच्या सभेच्या सुरवातीला स्व. अटलबिहारी वाजपेयीजी, शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे, स्व. अजित वाडेकर, स्व. विजय चव्हाण, स्व. गुरुदास कामत, स्व. करुणानिधी, स्व. दिगंबर जैन मुनी तसेच केरळ व कर्नाटक राज्यात अतिवृष्टीमुळे फार मोठ्या प्रमाणात जिवित व वित्त हानी झालेली असून या सर्वांना या सभागृहात श्रध्दांजली वाहीली असून आजची ही सभा तहकुब करुन सदर सभा दि. ०५/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**सभा तहकुबी ठराव क्र. ५४ :-**

आजच्या सभेच्या सुरवातीला स्व. अटलबिहारी वाजपेयीजी, शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे, स्व. अजित वाडेकर, स्व. विजय चव्हाण, स्व. गुरुदास कामत, स्व. करुणानिधी, स्व. दिगंबर जैन मुनी तसेच केरळ व कर्नाटक राज्यात अतिवृष्टीमुळे फार मोठ्या प्रमाणात जिवित व वित्त हानी झालेली असून या सर्वांना या सभागृहात श्रध्दांजली वाहीली असून आजची ही सभा तहकुब करुन सदर सभा दि. ०५/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील        अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्व सदस्यांनी श्रध्दांजलीसाठी जागेवर उभे रहायचे आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका